Press Release




## Mayem Lake beautification and upgradation works inaugurated by Hon'ble CM of Goa, Dr. Pramod Sawant

Panjim, August 27: Hon'ble Chief Minister of Goa, Dr. Pramod Sawant today inaugurated beautification and up-gradation works undertaken at Mayem Lake in the presence of a host of dignitaries and other officials.

Dr. Sawant, on Tuesday also launched Goa Tourism's adventure initiative Bungee Jumping Site at Mayem which now throws open its doors for tourists to enjoy Mayem Lake in full splendor and excitement as the tourism season gets underway next month. The Rs 16 crore beautification and upgradation works undertaken at Mayem Lake has added new tourism tools and facilities for the benefit of visiting tourists.

Mayem Lake is a popular tourism destination of our state. The lake is located in the hinterlands at the foothills of Western Ghats near Bicholim Town which is at a distance of 35 Kms from

Panaji. Mayem Lake is known for the scenic beauty, leisure activities, as a picnic spot, for boating and photography etc. The lake needed addition of new tourism tools and facilities for attracting more tourists, the boating facility for which the lake is famous for needed upgradation .Moreover as the lake destination provided lot of employment opportunities to the local youth to further improve the opportunities , the project was conceived and implemented at a cost of Rs. 16.6 Cr. The works undertaken include development of approach road and parking area for around 57 cars, 40 two wheelers and 10 tourist buses with a 12m wide approach road and grand new entrance.

A proper entrance, ticketing booth and tourist information office has been provided at the entrance for the guidance and benefit of the tourists. A smooth 2m wide walkway has been created with gradient slope of 1:15 for free movement of tourists including the differently-abled. There is a natural trail, where people can feel and experience the lake view and the natural beauty. The existing lake retaining wall and parapet has also been strengthened.
Picnic spots numbering 12 of different capacity have also been developed. A play area for children with a multiunit, swings, sew saw, slopes etc. adds attraction at Mayem Lake. An air-conditioned mirror maze along the pathway for a hilarious experience including funny mirrors is sure to draw huge crowds. A duck house with 9 pairs of ducks have been provided for entertainment of children.Also, an amphitheatre with a capacity for 120 people which can be increased to 200 is provided for showcasing the local folk and cultural dances. Other facilities include a souvenir shop, potter huts to promote local artisans toilet blocks, landscaping, drinking water facility, restaurants etc. As many as 20 new boats and a jetty with a terminal building for queing purpose and lake side restaurant for leisure dining has been provided. In addition, a small deck for educational fishing has been set up.

Other infrastructure facilities include a separate 160 KVA substation which will cater to all the electrical needs and a 10 KVA UPS as a backup for all computers and networking systems.
Street lighting for pathways and parking lot illumination is also provided. To ensure safety and security of tourists, CCTV cameras are installed, signage are installed for tourist information and hindrance free movement of the tourists. The entire beautification and upgradation works at

Mayem Lake has been undertaken by the Project Cell (SPV), of the Goa Tourism Development Corporation Ltd. The project consultants are M/s Fourth Dimension Architect Pvt Ltd and contractor, M/s. Bagkiya Constructions Pvt Ltd. The total project area developed is 13,333.00 sq. m.

प्रेस रीलीज




**<u>मायेम तलाव सुशोभीकरण आणि आधुनिकीकरण कामाचे गोव्याचे माननीय मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते उद्घाटन</u>**

पणजी, 27 ऑगस्ट - **गोव्याचे माननीय मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी आज मायेम तलाव सुशोभीकरण आणि आधुनिकीकरण कामाचे उद्घाटन केले. यावेळेस कित्येक मान्यवर आणि अधिकारी उपस्थित होते.**

डॉ. सावंत यांनी मंगळवारी मायेम येथे गोवा टुरिझमने सुरू केलेला नवा साहस उपक्रम बंजी जंपिंगचेही उद्घाटन केले असून त्यामुळे पुढील महिन्यात सुरू होणाऱ्या पर्यटन हंगामात या ठिकाणी उत्साही पर्यटकांची गर्दी होईल. मायेम तलाव येथे सुरू करण्यात आलेल्या 16 कोटी रुपयांच्या सुशोभीकरण आणि आधुनिकीकरण कामामुळे पर्यटनाच्या नव्या सुविधा व साधने उपलब्ध होतील व त्या पर्यटकांसाठी फायदेशीर ठरतील.

मायेम तलाव हे आमच्या राज्यातील लोकप्रिय पर्यटन स्थळ आहे. हा तलाव बिचोली शहराजवळ पश्चिम घाटाच्या पायथ्याशी वसलेला असून तो पणजीपासून 35 किमी अंतरावर आहे. मायेम तलाव त्यांचे निसर्गरम्य सौंदर्य, लीझर उपक्रम, सहलीचे तसेच बोटिंग व फोटोग्राफीचे ठिकाण म्हणून लोकप्रिय आहे. जास्तीत जास्त पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी या स्थळी पर्यटनाच्या नव्या सुविधा व साधनांची तसेच येथील प्रसिद्ध बोटिंग सुविधेच्या आधुनिकीकरणाची आवश्यकता होती. त्याशिवाय स्थानिक तरुणांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या या ठिकाणाच्या रोजगार संधी आणखी विस्तारण्यासाठी तयार करण्यात आलेल्या या प्रकल्पाची संकल्पना व अंमलबजावणी किंमत 16.6 कोटी रुपये आहे. या कामाअंतर्गत या ठिकाणापर्यंत पोहोचवणाऱ्या रस्त्याचा तसेच 57 चारचाकी, 40 दुचाकी व 10 टुरिस्ट बस मावतील अशा पार्किंग जागेचा विकास, रस्ता रूंदीकरण व नवे प्रवेशद्वार यांचा समावेश आहे.

पर्यटकांना मार्गदर्शन करण्यासाठी व त्यांच्या फायद्यासाठी प्रवेशद्वार, तिकिट बुथ आणि पर्यटक माहिती कार्यालय स्थापन करण्यात आले आहे. 2 मीटर रूंदीचा रस्ता 1:15 उतारासह तयार करण्यात आला आहे, ज्यामुळे दिव्यांगांसह सर्व पर्यटकांना मोकळेपणाने ये- जा करता येईल. ही नैसर्गिक पायवाट आहे, जिथे लोकांना तलाव आणि निसर्गाचा आनंद घेता येईल. सध्या तलावाजवळ असलेली भिंत आणि संरक्षक कठडा कायम ठेवण्यात येणार आहे.
सहलीची 12 प्रकारची वेगवेगळी ठिकाणे विकसित करण्यात आली आहे. लहान मुलांना खेळण्यासाठी विशिष्ट जागा तयार करण्यात आली असून त्यात झोके, सी- सॉस, घसरगुंडी यांचा समावेश असल्यामुळे या ठिकाणाचे ते नवे आकर्षण झाले आहे. रस्त्याच्याकडे एसी सुविधेने युक्त आरशांचा भुलभुलैय्या तयार केला जाणार असून त्यात मजेदार आरशांचा समावेश करण्यात येणार असल्यामुळे त्या ठिकाणी नक्की गर्दी होईल. लहान मुलांच्या मनोरंजनासाठी बदकांच्या 9 जोड्या असलेले बदकांचे घर तयार करण्यात आले आहे. 120 लोकांना बसता येईल असे अम्फी थिएटर तयार करण्यात आले असून त्याची क्षमता 200 लोकांपर्यंत वाढवता येण्यासारखी आहे. या ठिकाणी स्थानिक लोकनृत्य आणि सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यास चालना दिली जाणार आहे. इतर ठिकाणांमध्ये सोव्हेनियर शॉप, स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी पॉटर हट्स,

टॉयलेट ब्लॉक्स, लँडस्केपिंग, पिण्याचे पाणी, रेस्टॉरंट यांचा समावेश आहे. 20 नव्या बोट्स, जेटी व रांग लावण्यासाठी स्थानक इमारत उभारण्यात आली आहे व लीझर डायनिंगसाठी तलावाकाठी रेस्टॉरंट उभारण्यात आले आहे. त्याशिवाय शैक्षणिक मासेमारीसाठी लहान डेक तयार करण्यात आले आहे.

इतर पायाभूत सुविधांमध्ये स्वतंत्र 160 केव्हीए सबस्टेशनचा समावेश आहे, जे सर्व प्रकारच्या इलेक्ट्रिकल गरजा पूर्ण करेल आणि 10 केव्हीए यूपीएस सर्व कम्प्युटर्स आणि नेटवर्किंग यंत्रणेचे बॅकअप म्हणून काम करेल.
रस्ते व पार्किंगसाठी प्रकाशयोजना पुरवण्यात आली आहे. पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे, माहितीसाठी चिन्ह फलक आणि मोकळेपणाने फिरण्यासाठी अडथळेमुक्त जागा पुरवण्यात आली आहे. मायेम तलावाचे सुशोभीकरण आणि आधुनिकीकरणाचे संपूर्ण काम गोवा पर्यटन विकास महामंडळाचे प्रोजेक्ट सेल (एसपीव्ही) यांना देण्यात आले आहे. प्रकल्पाचे सल्लागार म्हणून मेसर्स फोर्थ डायमेन्शन आर्किटेक्ट प्रा. लि. आणि कंत्राटदार मेसर्स बागकिया कन्स्ट्रक्शन्स प्रा. लि. आहेत. प्रकल्पाचा पूर्ण विकसित परिसर 13,333.00 चौरस मीटर आहे.